महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ
'बालभारती', सेनापती बापट मार्ग, पुणे-४११००४.

फोन : ०२०-२५६५९४६५/६६/६७/६८ फॅक्स क्र. : ०२०-२५६५०४६

## शुद्धिपत्रक

**विषय :** इयत्ता सातवी इतिहास व नागरिकशास्त्र विषयाच्या पाठ्यपुस्तकातील महाराणा प्रताप यांच्या उल्लेखाबाबत...

**संदर्भ :** शासन पत्र क्रमांक : संकीर्ण.२०१९/प्र.क्र.१३५/एसडी-४, दि. ९ जुलै २०१९

उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये इयत्ता सातवीच्या इतिहास व नागरिकशास्त्र विषयाच्या पाठ्यपुस्तकामध्ये पृष्ठ क्र. ८ वर देण्यात आलेल्या महाराणा प्रताप यांचेविषयीच्या उल्लेखाबाबत खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

| पाठ्यपुस्तकातील आशय | बदल |
|---|---|
| उदयसिंहाच्या मृत्यूनंतर महाराणा प्रताप हा मेवाडच्या गादीवर आला. मेवाडच्या अस्तित्वासाठी त्याने संघर्ष चालू ठेवला. महाराणा प्रतापने अखेरपर्यंत आपले स्वातंत्र्य टिकवण्यासाठी अकबराबरोबर संघर्ष केला. पराक्रम, धैर्य, स्वाभिमान, त्याग इत्यादी गुणांमुळे तो इतिहासात अजरामर झाला आहे. (पृष्ठ क्र.८) | उदयसिंहाच्या मृत्यूनंतर महाराणा प्रताप हे मेवाडच्या गादीवर आले. मेवाडच्या अस्तित्वासाठी त्यांनी संघर्ष चालू ठेवला. महाराणा प्रताप यांनी अखेरपर्यंत आपले स्वातंत्र्य टिकवण्यासाठी अकबराबरोबर संघर्ष केला. पराक्रम, धैर्य, स्वाभिमान, त्याग इत्यादी गुणांमुळे ते इतिहासात अजरामर झाले. (पृष्ठ क्र.८) |

सदरचा बदल शालेय स्तरावरील अध्ययन-अध्यापन प्रक्रियेशी संबंधित व इतर सर्व अनुषंगिक घटकांच्या निदर्शनास आणावा. यासंदर्भातील कार्यवाहीच्या सूचना त्यांना देण्यात याव्यात. सदरचे शुद्धिपत्रक हे पाठ्यपुस्तक मंडळाच्या www.ebalbharati.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे.

(डॉ.शकुंतला काळे)
**संचालक,**
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे ४

**क्रमांक :** ह/भाषा-भाषेतर/३९८५
**दिनांक :** ११/०७/२०१९

**प्रत : माहितीस्तव सविनय सादर**

१. मा. अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

२. मा. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१

**प्रति**, (१) केंद्रप्रमुख, (सर्व) केंद्रीय प्राथमिक शाळा......

(२) मुख्याध्यापक, प्राथमिक/माध्यमिक शाळा (सर्व)........

**प्रतिलिपी : माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

(१) शिक्षण संचालक, (प्राथमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

(२) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे

(३) विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व विभाग

(४) शिक्षणाधिकारी प्राथमिक/शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई, सर्व जिल्हा परिषद/शिक्षणाधिकारी माध्यमिक

(५) शिक्षण प्रमुख/शिक्षणाधिकारी/प्रशासन अधिकारी, महानगरपालिका सर्व